MHNG180006762014

| | | |
|---|---|---|
| **दाखल तारीख** | : | **०५.११.२०१४** |
| **नोंदणी तारीख** | : | **०५.११.२०१४** |
| **निकाल तारीख** | : | **१५.०५.२०२६** |
| **कालावधी** | : | **वर्ष महिने दिवस**<br>**११ ०६ ११** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी (न्यायालय क्र. १), कळमेश्वर यांचे न्यायालय**
**(पिठासीन अधिकारी – आर.एल. राठोड)**

**नियमित फौजदारी खटला क्र. १४८/२०१४** **निशाणी क्र. ३५**

**(पोलिस स्टेशन कळमेश्वर येथील गुन्हा नोंद क्र. २०३/२०१४**
**भारतीय दंड संहितेचे कलम ३२६ सहकलम ३४ अन्वये)**

**अभियोग पक्ष /फिर्यादी** : महाराष्ट्र शासन तर्फे
पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस ठाणे कळमेश्वर, जि. नागपूर

**फिर्यादीः सौ अफसाना शम्मी शेख**
वयः ३२ वर्षे, व्यवसायः गृहिणी
रा. : वॉर्ड क्र.१, सवंद्री
तह. कळमेश्वर, जि. नागपूर

**तर्फे विद्वान विधीज्ञ** : सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती पल्लवी सोनवणे

**आरोपी**

**१. रजिया बेगम ईलियास शेख**
वयः ४५ वर्षे, व्यवसायः घरकाम,

**२. इरफान इलियास शेख**
वयः २५ वर्षे, व्यवसायः शिक्षण,

**३. इर्शाद इलियास शेख**
वयः २२ वर्षे, व्यवसायः मजुरी,
सर्व रा. : सुसुंद्री, तह. कळमेश्वर, जि. नागपूर
ह.मु. ब्राम्हणी, तह. कळमेश्वर, जि. नागपूर

**आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ** : श्री एच. आय. ताजने

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ०१.०७.२०१४ |
| पहिली खबर दिनांक | : | ०२.०७.२०१४ |
| दोषारोपपत्र दिनांक | : | ०१.११.२०१४ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित दिनांक | : | १०.०८.२०१५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | २१.०८.२०१५ |
| न्यायनिर्णयाकरीता निश्चित केल्याचा दिनांक | : | १५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १५.०५.२०२६ |
| शिक्षेचा दिनांक, शिक्षा झाली असल्यास | : | निरंक |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्रं. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षेचा तपशील | कलम ४२८ फौ.प्र. संहितेच्या अनुषंगाने संपरीक्षे दरम्यान कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रजिया बेगम इलियास शेख | ०२.०७.२०१४ | ०२.०७.२०१४ | भा.द.सं. ३२५,३२३ सहकलम ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | इरफान इलियास शेख | ०२.०७.२०१४ | ०२.०७.२०१४ | | निर्दोष | निरंक | निरंक |
| ३. | इरसाद इलियास शेख | ०२.०७.२०१४ | ०२.०७.२०१४ | | निर्दोष | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष /आरोपी / न्यायालयाचे साक्षीदारांची यादी**

**अ ) अभियोग पक्ष –**

| क्रमांक | नाव | | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|---|
| १. | शमी दिलावर शेख | : | जखमी |
| २. | अफसाना समीर शेख | | फिर्यादी |
| ३. | शेख मेहबुब शेख बहादुल्ला शेख | | घटनास्थळ /जप्ती पंच |
| ४. | फारुख अब्दुल करीम शेख | | साक्षीदार |

**ब ) आरोपीतर्फे साक्षीदार, असल्यास –**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| --- निरंक --- | | |

**क ) न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यास –**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| --- निरंक --- | | |

**<u>अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयाचे निशाणी क्रमांकाची यादी</u>**

**अ ) अभियोग पक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | १० / सा.क्र. २ | फिर्याद |
| २. | ११ / सा.क्र. २ | छापील फिर्याद |

**ब ) आरोपी / बचाव पक्षाचे साक्षीदार –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | | |

**क ) न्यायालयाचे साक्षीदार –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड ) मुद्देमाल –**

| अ.क्र. | मालमत्ता नोंदणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | जी.पी. क्रमांक ११६/२०१४ | एक सेंट्रिंगचे लाकूड,<br>एक दात सिलबंद |

## <u>न्या य नि र्ण य</u>

**(दि. १५ मे, २०२६)**

१. **<u>थोडक्यात अभियोगपक्षाचे कथन पुढीलप्रमाणे –</u>**

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम– ३२५,३२३ सहकलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाचे कलमांखालील दोषारोपत्रा नुसार खटला चालविण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रथम खबरी सौ अफसाना समीर शेख ही सवंद्री येथील रहिवासी असून रहिवासी आहे. त्यांचे व त्यांच्या जावेचे घराच्या हिश्श्याच्या कारणावरुन न्यायालयात दावा प्रलंबित आहे. दिनांक ०१.०७.२०१४ रोजी त्या घरी हजर असताना तिची जाउ व तिची तीन मुले आली होती. तिच्या मोठया जावेचा मुलगा इरफान त्यांच्या घरासमोर त्यांची चारचाकी गाडी लावत असल्यामुळे त्यांना येण्याजाण्यासाठी अडचण होत होती. तेव्हा त्यांनी इमरानला तुझी गाडी बाजुला लाव असे म्हटले असता प्रथम खबरीची मोठी जाउ तिला शिव्या देवू लागली. तेवढयात प्रथम खबरीचे पती समीर तेथे आले व त्यांनी काय झाले म्हणून विचारणा केली असता त्यांच्या मोठया जावेची मुले इरफान व इरशाद यांनी तिच्या पतीला मारहाण केली. इरफानने सेंट्रिंगच्या काठीने तिच्या पतीच्या तोंडावर मारले. त्यामुळे त्यांचे खालील दोन दात तुटले व रक्त निघू लागले. प्रथम खबरीच्या मोठया जावेने तिचे केस पकडून ओढले. त्यामुळे तिचे डोके दुखू लागले. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

३. प्रथम खबरीच्या फिर्यादवरुन कळमेश्वर पोलीस स्टेशनला अपराध क्र.२०३/२०१४ भा.दं.वि.कलम– ३२५,३२३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा दाखल करुन तपास अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, आवश्यक कागदपत्रे हस्तगत केली. तसेच संबंधीत साक्षीदारांचे जबाब नोंदवून सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

**४.** प्रकरणात माझ्या पूर्व पिठासीन अधिका–यांनी आरोपींच्या हजेरीनंतर आरोपींविरुध्द नि.क्र. ०३ क खाली भा.दं.सं. चे कलम– ३२६, सहकलम ३४ खाली दोषारोप ठेवले. आरोपींनी नि.क्र. ४ ते ६ अन्वये दोषारोप नाकारल्यामुळे प्रकरण पुढे चालविण्यात आले.

**५.** सदरील प्रकरणात अभियोगपक्षाने प्रथम खबरी, घटनास्थळ पंच, जखमी साक्षीदार व साक्षीदार यांना तपासले. प्रकरण ११ वर्षापूर्वीचे असून तसेच पुरेशा साक्षीदारांची साक्ष नोंदविल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. सदरील प्रकरणात आरोपींविरुध्द त्यांना गुन्हयात गुंतविणारा पुरावा आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम–३१३ अन्वये बयाण नोंदविण्यात आले. आरोपींनी केस खोटी असल्याचा बचाव घेतला. परंतु त्यानंतर प्रथम खबरी व आरोपींनी निशाणी क्र. ३३ नुसार आपसी समझोत्याची पुरसीस प्रकरणात दाखल केली. आरोपी व प्रथम खबरी यांची न्यायालयाबाहेर आपसी तडतोड झालेली आहे.

**६.** प्रकरणात अभियोगपक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे व दस्तऐवजांचे अवलोकन करता पुढील मुद्दे या न्यायायालयाच्या समक्ष न्यायनिर्णयाकरीता उपस्थित झाले. ते मुद्दे व त्याबाबत निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, दि. ०१.०७.२०१४ रोजी रात्री ८.०० वाजताचे दरम्यान सुसुंद्री, वॉर्ड क्र. १, ता. कळमेश्वर, जि. नागपूर येथे आरोपींनी संगनमत करुन शेख शम्मी शेख दिलावर याला काठीने (राफ्टरने) मारुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहचविली ? | : | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | : | **निर्दोष मुक्तता.** |

## ।। का र ण मी मां सा ।।

७. अभियोगपक्षाचे विद्वान वकील व बचावपक्षाचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचा युक्तीवाद अभिलेखाप्रमाणे केला.

**मुद्दे क्र.१ करिताः–**

८. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाला आरोपींनी संगनमत करुन प्रथम खबरीचे पती शेख शम्मी दिलावर शेख याला सेंटिंगच्या काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहचविली, ही बाबी सिध्द करणे गरजेचे व आवश्यक आहे.

९. अभियोगपक्षातर्फे अभियोगपक्षाचे जखमी साक्षीदार शमी दिलावर शेख (साक्षीदार क्र.१) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, मौजा सुसुंद्री येथील वॉर्ड क्र. १ मध्ये त्यांचे घर आहे व सुसुंद्री बस स्थानकाजवळ त्यांचे वेल्डींगचे दुकान आहे. सदर दुकान त्यांच्या घरापासून अंदाजे सातशे मीटर अंतरावर आहे व त्यांच्या घराशेजारी त्यांचे मोठे चुलते अब्दुल करीम यांचे घर

आहे. दिनांक ०१.०७.२०१४ रोजी रात्री ७.४५ वाजताच्या सुमारास ते त्यांचे वेल्डींगचे दुकान बंद करुन त्यांची मोटारसायकल क्र. एम.एच. ३१/ई–१९५५ ने घरी येण्यास निघाले असता त्यांच्या घराजवळ आरोपी क्र. २ इरफानने त्याला धक्का दिला आणि तेरी माँ की चुद अशी शिवी दिली. त्यावेळी आरोपी क्र. ३ इरशाद त्याची चारचाकी गाडी वळवीत होता. त्याला धक्का दिल्यामुळे तो खाली पडला. साक्षीदाराने आरोपी क्र. २ ला धक्का का दिला म्हणून विचारणा केली असता आरोपी क्र. २ इरशादने त्याला मारहाण करण्यास सुरवात केली. मारहाणीचा आवाज ऐकून आरोपी क्र. १ रजिया देखील घटनास्थळी आली. त्या तिघांनी मिळून त्याला लाथाबुक्कयांनी मारहाण केली व आरोपी क्र. २ इरफानने बांधकामाचे राफ्टरने त्याच्या तोंडावर मारले. त्यामुळे त्याचे समोरचे दोन दात पडले व तो बेशुध्द पडला. परंतु तो दोनच मिनिटात शुध्दीवर आला. त्याचा भाउ फारुख शेख व रफिक शेख याने त्याला आरोपींच्या तावडीतून सोडविले. त्यानंतर ते दोघे, जखमीची पत्नी अफसाना व जखमी असे भाउरावजी निमकर यांच्या किरायाच्या गाडीतून कळमेश्वर पोलीस स्टेशनला गेले व त्यांच्या पत्नीने फिर्याद दिली. त्यानंतर पोलिसांनी त्यांना मेयो हॉस्पिटलला पाठविले. सदर साक्षीदाराने घटनेवेळी वापरलेले राफ्टर व जप्त दात ओळखले.

**१०** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान त्याने हे मान्य केले की, त्याच्या घरामागे आरोपींचे घर आहे व सदर घराच्या संदर्भात आरोपी व त्याचेमध्ये दिवाणी दावा चालू आहे. पोलीस जबाबाच्या वेळी त्याने भाउराव निमकरचे किरायाचे गाडीतून कळमेश्वर पोलीस स्टेशन व तेथून सदर गाडीने

दवाखान्यात गेल्याचे सांगितले नव्हते. पुढे त्यांनी मान्य केले की, आरोपीकडे इनोवा गाडी होती की कसे हे त्याला सांगता येणार नाही. आरोपींनी सदर गाडी त्याचे घरासमोर लावल्याचे व त्यामुळे त्यांची पत्नी अफसाना हिने गाडी हटविण्याचे सांगितले हे त्याला माहिती नाही कारण तो त्यावेळी दुकानात होता. त्याने उलटतपासा दरम्यान नाकारले की, शकीलने आरोपी क्र. २ इरफानच्या नाकावर मारल्याने त्याचे नाकाचे हाड मोडले होते. त्याने नाकारले की, शकीलने गाडीची काच व आरोपी क्र. २ इरफानचे नाकाचे हाड मोडल्या कारणाने आरोपीविरुध्द त्यांनी खोटी केस दाखल केली आहे.

**११.** अभियोगपक्षातर्फे अभियोगपक्षाचे साक्षीदार प्रथम खबरी अफसाना समीर शेख (साक्षीदार क्र.२) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना दिनांक ०१.०७.२०१४ रोजी रात्री ८.०० वाजता सुसुंद्री येथे त्यांच्या घरसमोर घडली. सदर दिवशी व वेळी आरोपी क्र. २ इरफानने त्यांच्या घरासमोर चारचाकी गाडी उभी केली होती. त्याने त्याला विनंती केली की, 'गाडी बाजुला घे येणा–या जाणा–यांना अडचण होत आहे.' त्यावेळी आरोपी क्र. १ ने त्यांना शिव्या देण्यास सुरवात केली. त्यानंतर आरोपी क्र. २ इरफानने गाडी थोडी बाजुला घेतली व त्या घरात गेल्या. त्या घरात काम करीत असताना त्यांना बाहेरुन छुडाव छुडाव असा आवाज आला. त्यांनी बाहेर येवून पाहिले असात आरोपी क्र. १ ते ३ त्यांच्या पतीला मारत होते व दीर फारुक त्यांच्या पतीला सोडवित होता. त्यांच्या पतीच्या तोंडातून रक्त येत होते. त्यामुळे त्या पळत पतीकडे गेल्या असता आरोपी क्र. १ ते ३ हे त्यांना त्यांच्या पतीकडून बाजुला

घेत होते व तिचे केस ओढत होते. त्यावेळी आरोपी क्र. २ इरफान याच्या हातात बांधकामासाठी वापरले जाणारे लाकूड होते. तिने न्यायालयात ज्या राफ्टरने तिच्या पतीला मारण्यात आले होते ते ओळखले. त्यानंतर तिचे पती, ती, शकील व फारख असे पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यासाठी गेले व तिने कळमेश्वर पोलीस स्टेशनला फिर्याद व छापील प्रथम खबर दिली.

**१२.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान तिने हे मान्य केले की, गाडीच्या कारणावरुन आरोपी क्र. १ रजिया व तिच्यामध्ये वाद झाला होता. परंतु तिने नाकारले की, सदर वेळी शकीलने गाडीची काच फोडली आणि आरोपी क्र. २ इरफानचे नाकाचे हाड मोडले तसेच नाकारले की, सदर घटनेतून स्वतःचा बचाव करण्याकरिता आरोपींविरुध्द प्रस्तुतची खोटी फिर्याद दिली.

**१३.** अभियोगपक्षातर्फे अभियोगपक्षाचे पंच साक्षीदार शेख मेहबुब शेख बहादुल्ला शेख (साक्षीदार क्र.३) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, वादातील घटनेची निश्चित तारीख त्यांना आठवत नाही. सदर दिवशी त्याच्या गावी सुसुंद्री येथे रात्री ८.०० वाजताच्या सुमारास तो नमाजवरुन घरी येत असताना चाळीस पाउल अंतरावर असताना ते आरोपी क्र. २ इरफानला शेख शमीचे तोंडावर लाकडी राफ्टर मारताना बघितले. त्यानंतर फारुख, शेख शमीची पत्नी आणि शकील हे शमीला घरी घेवून गेले व ते त्यांच्या घरी गेलो. पोलिसांनी फक्त त्यांचा जबाब नोंदविला होता. या व्यतिरिक्त पोलिसांनी त्यांच्या समक्ष कुठलीही कारवाई केलेली नाही.

**१४.** सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्यामुळे सहायक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणीच्या स्वरुपातील उत्तरसुचक प्रश्न विचारले. सदर प्रश्नांची उत्तरे देताना साक्षीदाराने घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा मान्य करुन त्यावरील सह्या मान्य केल्या तसेच लांब राफ्टर (आर्टिकल अ ) पोलिसांनी आरोपी क्र. २ इरफानकडून जप्त केले असल्याचे मान्य केले.

**१५.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान त्यांनी हे मान्य केले की, शमी त्याच्या पत्नीचा भाउ आहे, नमाज १५ मिनिटे असून त्यांची मस्जिद गावातच आहे. इतर सर्व प्रश्नांची त्याने नकारार्थी उत्तरे दिली.

**१६.** अभियोगपक्षातर्फे अभियोगपक्षाचे साक्षीदार फारुख अब्दुल करीम शेख (साक्षीदार क्र.४) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ते सुसंद्री गावातील रहिवासी असून शमी दिलावर शेख त्यांचे शेजारी आहे. घटना दिनांक १.०७.२०१४ रोजी रात्री ७.३० वाजताच्या दरम्यान शम्मी दिलावर शेख यांच्या घरासमोर घडली. भांडणाचा आवाज ऐकून ते घराबाहेर निघाले तेव्हा त्यांना आरोपी इरफान , इरशाद, रजिया हेशम्मी दिलावर शेख याला पकडून मारत होते आणि त्यावेळी शमी त्यांना म्हणत होता की, मैने क्या किया. त्यांनी भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिनही आरोपी म्हणत होते की याला आज मारायचे आहे. त्यावेळी त्यांच्या घराच्या वर राहणारा रफीक तेथे आला व त्यानेसुध्दा भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आरोपी क्र. २ इरफान

याने सेंट्रींगचे राफ्टर घेवून शम्मीच्या तोंडावर मारले. त्यामुळे त्याच्या तोंडातून रक्त निघून तो खाली पडला. त्यानंतर तो, रफीक व अपसाना बेगम यांनी शम्मीला बाजुला घेतले. तरीदेखील आरोपींनी शम्मीला मारले. त्यानंतर आरोपी त्यांच्या चारचाकी वाहनातून निघून गेले. त्यानंतर त्यांनी , रफीक व शम्मीची पत्नी दोन दोन चाकी वरुन शम्मीला मोहपा गावी नेले व तेथून भाउराव निमकर यांच्या चारचाकी गाडीतून शम्मीला कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे आणले. शम्मीची पत्नी अफसाना हिने तेथे फिर्याद दिली. साक्षीदरम्यान दाखविण्यात आलेले राफ्टर त्यांनी ओळखले.

**१७.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान त्यांनी मान्य केले की, शम्मी त्यांचा चुलत भाउ आहे. त्यांनी मान्य केले की, आरोपीचे घर शम्मीच्या घरामागे असून आरोपीला शम्मीच्या घरातून जावे लागते. साक्षीदार शेख मेहबूब हा शम्मीचा जावई आहे. त्याने आरोपीला क्यो मार रहे बाबा म्हटल्याचे, शम्मी खाली पडल्यानंतर त्याला उचलून पुन्हा भांडण सोडविल्याचे, आरोपी शम्मीला मारत असल्याचे दिसल्याचे पोलिसांना बयान देताना सांगितले होते. परंतु ते त्याच्या बयानात का नाही याचे कारण त्याला सांगता आले नाही.

**१८.** सदरील प्रकरणात आलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, आरोपी क्र. २ ने चारचाकी उभी केली होती. प्रथम खबरी समक्ष आरोपीने राफ्टरने मारलेले नाही. ती जेव्हा घटनास्थळावर

गेली तेव्हा तिच्या पतीच्या तोंडातून रक्त येत होते. तिच्या पतीचे दात पडले याबाबत तिने कोणतेही कथन केलेले नाही.

**१९.** साक्षीदार शेख मेहबूब याच्या पत्नीचा भाउ जखमी शम्मी आहे. त्याने आरोपी क्र. २ ला शम्मीच्या तोंडावर लाकडी राफ्टर मारताना पाहिले होते. परंतु सदरील साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे त्याला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले. त्यामध्ये त्याने आरोपी इरफान च्या ताब्यातून लाकडी राफ्टर जप्त करुन जप्ती पंचनामा केल्याचे कथन केले. त्यावर त्याची व आरोपी इरफानची सही असल्याचे कथन केले. परंतु, निशाणी क्र. १४ वरील जप्ती पत्रकाचे अवलोकन केले असता सदरील साक्षीदाराचा अंगठा असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्याची साक्ष जप्ती पंचनाम्यासोबत जुळून येत नाही. म्हणून ती विश्वासार्ह वाटत नाही. त्यामुळे सदरील साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

**२०.** साक्षीदार शेख फारुख याने घटनेबाबत सांगितलेले असून तो जखमी शम्मीचा भाउ आहे. घराबाबत त्यांच्यात दिवाणी दावा सुरु आहे. ज्यावेळेस अफसानाने गाडी हटविण्याचे सांगितले होते त्यावेळेस तो दुकानात होता. सदरील साक्षीदार हे प्रथम खबरी व जखमीचा नातेवाईक असल्यामुळे या प्रकरणात स्वतंत्र साक्षीदार महत्त्वाचा आहे कारण घटना ही गावामध्ये घडलेली आहे. परंतु, सदरील प्रकरणात अभियोगपक्षाने एकही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. प्रथम खबरी व आरोपी यांच्यामध्ये पूर्वीपासून वाद असल्याचे अभिलेखावर आलेले आहे.

२१. सदरील प्रकरणात अभियोगपक्षाने वैद्यकीय अधिकारी यांना तपासलेले नाही. त्यामुळे अभिलेखावर दाखल केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र हे शाबीत झालेले नाही. त्यामुळे आरोपीने मारहाण केल्यामुळे प्रथम खबरीच्या पतीला गंभीर दुखापत झाली होती याबाबत आवश्यक तो सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदरील प्रकरणात अभियोगपक्षाने घटनास्थळ पंच यांना तपासलेले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा शाबीत झालेला नाही. तसेच इतर जप्ती पंच यांना सुध्दा तपासलेले नाही. त्यामुळे इतर जप्ती पंचनामे निशाणी क्र. १४ सोडता शाबीत झालेले नाही. तसेच अभियोगपक्षाने सदरील प्रकरणात तपासी अंमलदार यांना तपासलेले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा ही बाब अभियोगपक्ष तपासी अंमलदाराच्या माध्यमातून शाबीत करु शकलेला नाही.

२२. अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, घटनेच्या वेळेस बरेच लोक जमलेले होते. परंतु अभियोगपक्षाने एकाही स्वतंत्र साक्षीदाराला तपासलेले नाही.

२३. एकंदरीत सदरील प्रकरणात अभियोगपक्ष पंचनामे संशयापलिकडे शाबीत करु शकलेला नाही. तसेच स्वतंत्र साक्षीदार यांना तपासलेले नाही. अभियोगपक्ष आरोपी यांच्या विरुध्द सबळ पुरावा अभिलेखावर आणू शकलेला नाही. सदरील प्रकरणात दाखल केलेल्या अर्ज व पुरसीस वरुन असे दिसून येते की, आरोपी व फिर्यादी हे एकमेकांचे नातेवाईक असल्यामुळे आरोपी व प्रथम

खबरीमध्ये आता समझोता झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरील प्रकरणात पुराव्याबाबत जास्त उहापोह करणे आवश्यक दिसून येत नाही. आरोपीविरुध्द पुराव्याची साखळी जुळून येत नाही. त्यामुळे अभियोगपक्ष सदर खटला संशयापलिकडे शाबीत करण्यास अपयशी झालेला आहे.

**२४.** सदरील प्रकरणात आरोपींविरूद्ध सबळ पुरावा आलेला नाही. त्यामुळे निर्माण झालेल्या संशयाचा फायदा आरोपींना मिळतो. भारतीय दंड संहिताचे कलम– ३२६ प्रमाणे सिद्ध होण्यासाठी आवश्यक असलेले घटक अभिलेख पटलावर आलेले नाही. अभियोगपक्ष सदरील खटला संशंयापलीकडे आरोपींच्याविरूद्ध शाबीत करण्यास असफल झालेला आहे. त्यामुळे आरोपींना भारतीय दंड संहिताचे कलम–३२६ मधून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित वाटते. सबब, पुराव्या अभावी मी मुद्दे क्र.१ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र. २ साठी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम-२४८(१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ३२६ सहकलम या गुन्हयामधून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जमानतीचे बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्देमाल एक सेंट्रिंगचे लाकूड व एक सिलबंद दात मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावी.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम-४३७(अ) प्रमाणे स्वतःचे रु. १२,०००/- प्रत्येकी वैयक्तीक बंधपत्र देवून पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

RAVINDRA RATHOD
Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2026.05.15 15:32:02 +0530

**(आर.एल.राठोड)**

**कळमेश्वर** **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**

**दि. १५.०५.२०२६** **कळमेश्वर, नागपूर**

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 11.05.2026 |
| Judgment dictated on | : | 15.05.2026 |
| Transcription Ready on | : | 15.05.2026 |
| Judgment checked and signed off | : | 15.05.2026 |

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर.एम. परमाल (ग्रेड – ३)